जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2025
तरुण भारत

# डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर

■ बुधवारी शिवाजी विद्यापीठात पुरस्कार प्रदान सोहळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामार्फत दोन वर्षातून एकदा देण्याल येणारा डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार यंदा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर झाला आहे. रोख ५१ हजार रूपये, मानपत्र, शाल व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण बुधवारी, २० रोजी दुपारी ३.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.



अर्थशास्त्रात भरीव योगदान देणाऱ्या आंतरराष्ट्रीय तथा राष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम व्यक्ती अथवा संस्थेला हा पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कारासाठी शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनने शिवाजी विद्यापीठाकडे एकत्रित निधी सुपूर्द केला आहे. पहिला पुरस्कार विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांना प्रदान केला आहे. यंदा या पुरस्कारासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शोध समितीने अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची एकमताने निवड केली आहे. या शोध समितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. शिर्के आहेत. समितीमध्ये डॉ. महादेव देशमुख, प्रा. जे. ए. यादव, डॉ. विजय ककडे, डॉ. राहुल म्होपरे यांचा समावेश आहे. पुरस्कार प्रदानाचे आयोजन विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन यांनी संयुक्तरित्या केले आहे. अर्थशास्त्रासह शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्ती, अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन मानवविज्ञान शाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले आहे.

## डॉ. नरेंद्र जाधव यांच्याविषयी


डॉ. नरेंद्र जाधव ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि लेखक म्हणून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर परिचित आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रमुख आर्थिक सल्लागार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, नियोजन मंडळाचे माजी सदस्य, राज्यसभेचे माजी सदस्य, धोरणतज्ज्ञ, उत्कृष्ट वक्ते म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2025
सकाळ

# 'जे. एफ. पाटील स्मृती' पुरस्कार डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर

## शिवाजी विद्यापीठात २० ऑगस्ट रोजी वितरण

■ सकाळ वृत्तसेवा



डॉ. नरेंद्र जाधव

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठातर्फे दोन वर्षांतून एकदा देण्यात येणारा प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर आज करण्यात आला. रोख रक्कम ५१ हजार रुपये, मानपत्र, शाल व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराचे वितरण २० ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.

अर्थशास्त्रात भरीव योगदान देणाऱ्या आंतरराष्ट्रीय तथा राष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम व्यक्ती अथवा संस्थेला हा पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कारासाठी शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनने विद्यापीठाकडे एकत्रित निधी सुपूर्द केला आहे. पहिला पुरस्कार विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांना प्रदान करण्यात आला आहे.

यंदा या पुरस्कारासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शोध समितीने अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची एकमताने निवड केली आहे. या शोध समितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. शिर्के असून, समितीमध्ये डॉ. महादेव देशमुख, प्रा. जे. ए. यादव, डॉ. विजय ककडे आणि डॉ. राहुल म्होपरे यांचा समावेश आहे. पुरस्कार प्रदान समारंभाचे आयोजन विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन यांनी संयुक्तरीत्या केले आहे. अर्थशास्त्रासह शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्ती, अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. देशमुख यांनी केले आहे.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2025
पुण्यनगरी

# प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामार्फत दोन वर्षांतून एकदा देण्यात येणारा प्रा. डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर केला आहे. रोख रक्कम ५१ हजार रुपये, मानपत्र, शाल व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. दि. २० ऑगस्ट रोजी दुपारी ३.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

अर्थशास्त्रात भरीव योगदान देणाऱ्या आंतरराष्ट्रीय तथा राष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम व्यक्ती अथवा संस्थेला हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्कारासाठी शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनने शिवाजी विद्यापीठाकडे एकत्रित निधी सुपूर्द केला आहे. पहिला पुरस्कार विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा.



डॉ. सुखदेव थोरात यांना प्रदान करण्यात आला आहे. यंदा पुरस्कारासाठी शोध समितीने अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची एकमताने निवड केली आहे. समितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. शिर्के आहेत. समितीमध्ये डॉ. महादेव देशमुख, प्रा. जे. ए. यादव, डॉ. विजय ककडे व डॉ. राहुल शं. म्होपरे यांचा समावेश आहे. पुरस्कार प्रदान समारंभाचे आयोजन शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग व शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन यांनी संयुक्तरीत्या केले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन मानवविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले आहे.

डॉ. जाधव ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि लेखक म्हणून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर परिचित आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रमुख आर्थिक सल्लागार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, नियोजन मंडळाचे माजी सदस्य, राज्यसभेचे माजी सदस्य, धोरणतज्ज्ञ, उत्कृष्ट वक्ते म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2025
सकाळ

# विद्यार्थ्यांनी समजून घेतले 'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण'

कोल्हापूर, ता. १२ : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (एनएसओ) उपक्षेत्रीय कार्यालय, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे 'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (एनएसएस) ची ७५ वर्षे' या विषयावर आज कार्यशाळा पार पडली.

विद्यापीठाच्या निलांबरी सभागृहामध्ये संख्याशास्त्र विषयाच्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. त्याचे उद्‍घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. बी. महाडिक, एनएसओ पुणे क्षेत्रीय कार्यालयाच्या सहसंचालक डॉ. रुही कुलकर्णी, कोल्हापूर उपक्षेत्रीय कार्यालयाचे सहायक संचालक वेदान्त कोंडकर, प्रा. एस. व्ही. राजगुरू प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी राष्ट्रविकासातील एनएसओचे महत्त्व अधोरेखित केले. एनएसओ मार्फत उपलब्ध असलेल्या डेटाचे सखोल विश्लेषण करावे, असे आवाहन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 3 AUG 2025
पुण्यनगरी

# संशोधनामुळे जीवनाच्या गुणवत्तेत भर : डॉ. कांबळे

**कोल्हापूर :** संशोधन हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून, मानवी जीवनाचा विकास संशोधनामुळे होतो आणि त्यामुळे मानवी जीवनाच्या गुणवत्तेत भर पडते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील वरिष्ठ प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समधील रिसर्च सेलमार्फत आयोजित प्रकल्प अहवालासाठी संशोधन पद्धती या विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी होत्या. संशोधन म्हणजे पद्धतशीरपणे केलेला अभ्यास होय. या पद्धतीने अभ्यास करावयाचा असेल, तर संशोधन पद्धती आत्मसात करावी लागते, तरच संशोधन हे दर्जेदार होते. मानवी जीवनाचा विकास होऊन मानवी जीवनाच्या गुणवत्तेत भर पडते, असेही डॉ. कांबळे म्हणाले. प्रास्ताविक रिसर्च सेल व विधी विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. देसाई यांनी केले. आभार डॉ. पी. एन. देवळी यांनी मानले. प्रा. डॉ. के. जी. कांबळे डॉ. एन. एच. जाधव, प्रा. के. डी. दिंडे, डॉ. आर. जे. बिरजे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2025
पुण्यनगरी

# कुलसचिव शिंदे यांना 'शब्दांगण' पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना शब्दांगण राज्य साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. शुक्रवार, दि. १५ रोजी दुपारी ३ वाजता करवीर नगर वाचन मंदिरमध्ये ज्येष्ठ कवयित्री व साहित्यिका नीलांबरी कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती साहित्य पुरस्काराच्या अध्यक्षा शोभा राऊत यांनी दिली. यावेळी ज्येष्ठ कवी अशोक भोईटे यांच्या उपस्थितीत कवी संमेलन होणार आहे. तसेच प्रौढ लेखक, नवोदित लेखक, कविता संग्रह (प्रौढ) व नवोदित कवींना पुरस्कारांचे वितरणही करण्यात येणार आहे. या पुरस्कारामुळे नवोदित कवींना प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या कविता अधिक स्फूरण पावणार आहेत, त्यामुळे या कार्यक्रमास रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

